# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला
ई ब्लॉक , सी २२, वांद्रे- कुर्ला
संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ:- www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल
bocwwboardmaha@gmail.com

जा. क्र.मइवइबाकमं/आ. त./प्र.क्र.०७/यो-०२/238/२०२३ दिनांक:- ०२ मे,२०२३

## सुधारीत कार्यादेश

**प्रति,**

**असोसिएट व्हाईस प्रेसिडेन्ट (मार्केटिंग)**
**मे.एच. एल. एल. लाईफकेअर लिमिटेड,**
**एल एल एल भवन पुजापुरा**
**तिरूअंनतपुरम, केरला**

**विषय** :- **मंडळातील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याचा कार्यारंभ आदेश.**

**संदर्भ** :-
१. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१८/प्र.क्र१७/काम-७ दि.२१.१२.२०१९.
२. या कार्यालयाचे कार्यादेश क्र.मइवइबाकमं/ आरोग्य तपासणी/ १७३/२०१९ दि.२४.१२.२०१९.
३. मे.एचएलएल लाईफकेअर लिमिटेड यांचा दि.०७.०३.२०२२ रोजीचा प्रस्ताव
४. या कार्यालयाचे पत्र क्र.आरोग्य तपासणी योजना/२०२२/प्र.क्र.०७/ योजना-०२/१०६१ दि.१०.०५.२०२२
५. या कार्यालयाचे पत्र क्र. आरोग्य तपासणी योजना/२०२२/प्र.क्र.०७/ योजना-०२/११२८ दि.१८.०५.२०२२
६. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र१७/काम-७ दि.२९.०६.२०२२.

७. मंडळ व मे.एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यातील करारनामा दि.२६.०६.२०२२ व कार्यादेश क्र.१४७९ दि.२९.०६.२०२२
८. या कार्यालयाचे पत्र क्र. मइवइबाकमं/HLL प्रस्ताव/३२४७/योजना-०२ दि.१६.०२.२०२३.
९. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र१७/काम-७ दि.२७.०२.२०२३.
१०. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र१७/काम-७ दि.०१.०३.२०२३.
११. मंडळ व मे.एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यातील विषयांकित प्रकरणी करारनामा दि.०१.०३.२०२३.
१२. या कार्यालयाचे कार्यादेश क्र.मइवइबाकमं/ आ.त./ प्र.क्र.०७/यो-०२/३४४३/२०२३ दि.०१.०३.२०२३
१३. या कार्यालयाचे पत्र क्र. मइवइबाकाकमं/आरोग्यत/प्र.क्र.-७/३६३९/२०२२/योजना-२ दि.२७.०३.२०२३.
१४. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र१७/काम-७ दि.२७.०४.२०२३

**महोदय,**

मंडळातील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणीवावत संदर्भ क्र. (०१) ते (०७) अन्वये वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. मंडळातील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची व त्याच्या कुटुंबामधील (अवलंबितामधील) यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांच्या दोन अविवाहित १० वर्षावरील अपत्ये यांची मे.एच.एल.एल.लाईफकेअर प्रा.लि. या कंपनीमार्फत २३ चाचण्या प्रति व्यक्ती रु.३९००/- दराने करण्याबावत शासनाच्या संदर्भ क्र. (०९) व (१०) अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.त्यानुसार संदर्भ क्र. (११) अन्वये मंडळ व मे.एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यामध्ये सदर प्रकरणी दि.०१.०३.२०२३ करारनामा करण्यात आला आहे व संदर्भ क्र. (१२) अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.मंडळाच्या संदर्भ क्र. (१३) अन्वये मागविण्यात आलेल्या मार्गदर्शनाबाबत संदर्भ क्र. (१४) अन्वये शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.त्यानुसार संदर्भ क्र. (१२) अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या कार्यादेशातील (३) (ii) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

"सदर आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजनाकरिता बांधकामाच्या ठिकाणाची निवड करून जिल्हा कार्यालयाची मान्यता प्राप्त करण्यात यावी.मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) सर्व बांधकाम कामगारांची व त्यांच्या कुटुंबामधील (अवलंबितामधील) यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची दोन अविवाहित १० वर्षावरील अपत्ये यांची आरोग्य तपासणी करावी. संबधित व्यक्तींची (बांधकाम कामगार व कुटुंब) **वर्षातून एक वेळ आरोग्य तपासणी** करावयाची असून, आरोग्य तपासणी करताना व्यक्तीची दुरूक्ती होणार नाही याची विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालय यांनी दक्षता घ्यावी."

२. सदर सुधारीत कार्यादेशाची अंमलबजावणी सदरचा सुधारीत कार्यादेश निर्गमित केलेल्या दिनांक ०२ मे,२०२३ पासून करण्यात यावी.

०२/०५/२०२३

**(विवेक कुंभार)**
**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.**

**प्रत :-**

१. मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्रधान सचिव, (कामगार), उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
४. अप्पर कामगार आयुक्त मुंबई कोकण विभाग/ पुणे/ नागपूर यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.
५. कामगार उप आयुक्त, मुंबई शहर/मुंबई उपनगर (पुर्व)/ मुंबई उपनगर (पश्चिम)
६. नाशिक/ औरंगाबाद/ पालघर/ रायगड यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.
७. सहाय्यक कामगार आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी (सर्व जिल्हा कार्यालये) यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.